# Maharashtra Times

## water supply department of badalpur have vacancy

३० टक्के कर्मचाऱ्यांवर कारभार,
पाणीपुरवठ्यावर परिणाम

म. टा. वृत्तसेवा, बदलापूर

झपाट्याने विकसित होत असलेल्या बदलापूर शहराला पाणी टंचाईची झळ बसू न देणाऱ्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (मजीप्रा)चा कारभार चार वर्षांपासून केवळ ३० टक्के कर्मचाऱ्यांच्या खांद्यावर हाकला जात

रिक्त असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे उपलब्ध पाणीसाठ्याचे नियोजन करण्यासाठी मनुष्यबळ अपुरे पडत असून शहरातील नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. प्राधिकरणाची इतर कामेही रखडली आहेत.

बदलापूर शहरात अनेक मोठे गृहप्रकल्प उभे राहत आहेत. त्यामुळे शहराची लोकसंख्याही झपाट्याने वाढत आहे. शहरातील नागरिकांना पुरवण्यात येणाऱ्या प्राथमिक सुविधांवर या वाढत्या लोकसंख्येचा ताण पडत आहे. नागरिकांना वेळेत पाणी, वीज आणि पालिकेतील सुविधा उपलब्ध न प्रशासकीय कार्यालयात मनुष्यबळ अपुरे असल्याने त्याचा ताण नागरी सेवांवर पडत असल्याचे समोर येत आहे. त्यातच बदलापूर शहराला मुबलक पाणीसाठा उपलब्ध असतानाही मजीप्रातील कर्मचाऱ्यांमधील समन्वयाचा अभाव आणि अपुरे मनुष्यबळ याचा फटका पाणी वितरणात होत असल्याचे नुकतेच मजीप्राच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

मागील चार वर्षांत बदलापूर मजीप्रामध्ये विविध ७० टक्के पदे रिक्त असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे आहे त्या कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण पडत असल्याने त्याचा परिणाम पाणीपुरवठा आणि मजीप्राच्या इतर कामांवर होत असल्याचे समोर आले आहे. यात जलसेवक, वॉलमन, पंपचालक, जोडीदार, सुरक्षारक्षक आणि निरीक्षक अशी महत्त्वाची पदे अनेक वर्षांपासून रिक्त आहेत. शासकीय आकृतीबंधानुसार पूर्व भागात ४५, तर पश्चिम भागात ६६ कर्मचाऱ्यांची गरज असताना दोन्ही भागांत केवळ अठरा कर्मचारी सद्यस्थितीत कार्यरत आहेत. त्यांच्यावर सर्व कामाचा ताण पडत असल्याने अकुशल कर्मचाऱ्यांनाही इतर जबाबदाऱ्या दिल्या जात आहे. त्यामुळे शहरातील पाणी पुरवठ्याचे नियोजन बिघडले आहे. शहरातील बेकायदा जोडण्या, पाणी गळती, दुरुस्ती, सुरक्षा आदी कामे रखडत आहेत.

**४० टक्के पाणीगळती**

मजीप्राच्या अपुऱ्या कर्मचाऱ्यांचा परिणाम शहरातील नियोजनावर होत असून शहरात ४० टक्के पाणी गळती सुरू आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. वेळेवरच ही पदे भरली तर मजीप्राची यंत्रणा सक्षम होऊन नागरिकांना मोर्चे घेऊन येण्याची वेळ येणार नाही.